**आदेश**

जा.क्र.विशा/कोरोना नि.कक्ष/ ११३६ /२०२०
पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर
दिनांक :- ०८/०४/२०२०

ज्या अर्थी महाराष्ट्र राज्यात दिनांक १३ मार्च २०२० च्या अधिसुचनेनुसार, साथरोग अधिनियम, १८९७ ची अंमलबजावणी सुरु झालेली आहे. त्याअर्थी साथरोग अधिनियम, १८९७ च्या खंड २,३ व ४ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र शासन राज्यात कोरोना विषाणुमुळे (covid-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियत्रंण यासाठी नियम प्रसिध्द करण्यात आले आहे व या नियमांना '' महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२० '' असे संबोधण्यात आले आहे.

१. ज्याअर्थी साथरोग अधिनियमांच्या खंड २ (१) नुसार पोलीस आयुक्त यानांही त्यांच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड -१९ वर नियत्रंण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी ते सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत करण्यात आले आहे.
२. ज्या अर्थी कोव्हीड १९ च्या संदर्भातील अभ्यासाअंती अशी बाब समोर आली आहे की, मास्क परिधान केल्याने कोरोना विषाणुचा प्रसार कमी होऊ शकतो. सामाजीक अंतर राखण्याच्या उपायांबरोबरच परस्पंराच्या संपर्कात येणाऱ्या व्यक्तींच्या बाबतीत मास्क परिधान करणे महत्वपुर्ण आहे.
३. त्याअर्थी मी अशा निष्कर्षाप्रत आलो आहे की, जनहितार्थासाठी सार्वजनिक ठिकाणी फिरणाऱ्या व्यक्तींनी मास्क परिधान करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी मी विवेक फणसळकर, पोलीस आयुक्त ठाणे शहर तथा विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणून शासनाच्या दिनांक ८ एप्रिल २०२० च्या अधिसुचनेद्वारे प्राधिकृत अधिकारी म्हणून ठाणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात खालील उपाययोजना लागू करीत आहोत.

१. सर्व व्यक्ती हया कोणत्याही कारणास्तव सार्वजनिक ठिकाणी जसे की, रस्ता , रूग्णालय, कार्यालय , बाजारपेठ इ. ठिकाणी जात असल्यास मास्क परिधान करणे अनिवार्य आहे.
२. कोणतीही व्यक्ती आपल्या वैयक्तिक वाहनाने अथवा शासकिय वाहनाने प्रवास करीत असल्यास मास्क परिधान करणे अनिवार्य आहे.
३. कोणतीही व्यक्ती वाहनांमध्ये / कार्यालयात/ कामाच्या कोणत्याही ठिकाणी काम करतेवेळी मास्क परिधान करतील.
४. कोणतीही व्यक्ती/ अधिकारी बैठक /लोकांचा जमाव, किंवा कामाच्या ठिकाणी हजर राहताना मास्क परिधान करतील.
५. मास्क केमिस्टकडे उपलब्ध असलेले सुधारित मास्क किंवा घरी बनविलेले धुण्या योग्य असे मास्क जे धुऊन निर्जंतुकिकरण करून पुन्हा वापरता येऊ शकतात असे मास्क वापरता येतील.

वरील सुचनांचे उल्लंघन करणारा व्यक्ती भारतीय दंडविधान संहिता कलम १८८ प्रमाणे शिक्षेस पात्र राहिल. वरील सुचनाचे अंत्यत काटेकोरपणे पालन केले जावे

(signature) ८/४/२०
विवेक फणसळकर
पोलीस आयुक्त,ठाणे शहर

Ravindra
PC 1112
08/04/2020